# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय

३०२, वेक फिल्ड हाऊस,३ रामजला, ब्रिटानियारेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.

दुरध्वनीक्र.०२२-२२६९४९८५/८४ Email:ccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com


**विषय:- कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण तक्रार निवारण समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तास मंजूरी मिळणेबाबत.**

जा.क्र./ल. ले/ 236 /सन २०२२-२३

फोर्ट, मुंबई ४००००१ दिनांक: 25/09/2023.

**प्रति,**

**मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग,**
**तथा अध्यक्ष,**
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती.**

**संदर्भ:-** कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची 25 वी बैठक दि. 12.09.2023.

**महोदय,**

उपरोक्त संदर्भान्वये कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण तक्रार निवारण समितीची 25 वी बैठक दि.12.09.2023 रोजी आपले अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. सदर बैठकीचे इतिवृत्त तयार करुन मंजूरीसाठी पाठविण्यात येत आहे.

तरी, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तास मंजूरी मिळणेस विनंती आहे.

**सोबत :- बैठकीचे इतिवृत्त**

**(अनिता पाटील)**
**सदस्य सचिव**
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण**
**तथा**
**उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.**

# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय

३०२, वेक फिल्ड हाऊस,३ रामजला, ब्रिटानियारेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.

दुरध्वनीक्र.०२२-२२६९४९८५/८४ Email:ccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com


**विषय:**- कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या 25 व्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र.कक्ष-1/ल.ले/ 237/सन 2023-24

फोर्ट, मुंबई 400001 दिनांक: 25/09/2023

**प्रति,**

1. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
2. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
3. मा. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे/नवी मुंबई.
4. मा. पोलीस अधिक्षक, ठाणे (ग्रा)रायगड/पालघर/रत्नागिरी/सिंधुदुर्ग (पोलीस उप अधिक्षक व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
5. मा. आयुक्त, महानगरपालिका बृहन्मुंबई / ठाणे / कल्याण-डोंबिवली / मिरा-भाईंदर / वसई-विरार / नवी मुंबई / पनवेल / भिवंडी-निजामपूर/ उल्हासनगर (उपआयुक्त व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
6. मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) ठाणे.
7. मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर (विभागीय वन अधिकारी व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
8. मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA)
9. मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO)
10. मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA)
11. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरण (SRA)
12. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC)
13. मा. संचालक, पर्यावरण तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र सागर तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA)
14. मा. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
15. मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्रिय अधिकारी.
16. उप वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई.
17. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई.
18. नवी मुंबई एन्व्हारमेंट प्रिझर्वेशन सोसायटी.
19. श्रीमती. हेमा रमाणी, बॉम्बे एन्व्हारमेंट ऍक्श्न ग्रुप.
20. श्री. स्टॅलिन डी, वनशक्ती (NGO)
21. महाराष्ट्र मच्छिमार कृती संघ यांचे प्रतिनिधी
22. संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS)
23. उप मीठ आयुक्त, मीठागरे विभाग, मुंबई (विशेष निमंत्रित)

**संदर्भ :**- या कार्यालयचे पत्र क्र.जा.क्र.कक्ष-1/ल.ले/220/सन 2023-24 दि.05.09.2023.

उपरोक्त संदर्भान्वये कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची 25 वी बैठक **मंगळवार, दिनांक** 12.09.2023 रोजी **मा. अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली** घेण्यात आली होती.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. तरी, कृपया अवलोकन होणेस विनंती आहे.

(अनिता पाटील)
**सदस्य सचिव,**
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती**
**तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई**

**सोबत : बैठकीचे इतिवृत्त.**

**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची 25 वी बैठक**
**दिनांक 12.09.2023 रोजीचे इतिवृत्त**
**मा. विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई.**

समितीचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग तसेच समितीचे सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष यांच्या अध्यक्षतेखाली कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची 25 वी बैठक पार पडली. समितीच्या सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा.अध्यक्ष यांच्या अनुमतीने समितीच्या कामकाजास सुरुवात झाली. सदर बैठकीस खालील नमूद अधिकारी व कर्मचारी व्यक्तीश: अथवा व्हि. सी. द्वारे उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| 1. | श्री. महेंद्र कल्याणकर | अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त कोकण विभाग | विभागीय आयुक्तांचे कार्यालय, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई |
| 2. | श्री. एस. व्ही. रामाराव (व्ही.सी.द्वारे) | सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई | कांदळवन कक्ष, मुंबई |
| 3. | श्री. राजेंद्र भोसले | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर |
| 4. | श्री. अभय पिंपळकर (व्ही.सी.द्वारे) | संचालक, पर्यावरण विभाग | पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई |
| 5. | श्री. विवेक गायकवाड | उप आयुक्त (महसूल), कोकण विभाग | विभागीय आयुक्तांचे कार्यालय, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई |
| 6. | श्रीमती अनिता पाटील | सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष | कांदळवन कक्ष, मुंबई |
| 7. | श्री. एम.आदर्श रेड्डी (व्ही.सी.द्वारे) | विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, कुर्ला | विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, कुर्ला |
| 8. | श्री. विशाल मदने (व्ही.सी.द्वारे) | अवर सचिव, पर्यावरण व वातावरणीय विभाग (कांदळवन प्रतिनिधी) | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय (MCZMA) |
| 9. | श्री. संजोग कबरे (व्ही.सी.द्वारे) | उपायुक्त, (विशेष) | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| 10. | श्री. किशोर तावडे | जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग | जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग |
| 11. | श्री. शंकर बर्गे (व्ही.सी.द्वारे) | अतिरिक्त जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग | जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग |
| 12. | श्री. सुभाष भागडे (व्ही.सी.द्वारे) | निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर | जिल्हाधिकारी पालघर |

| | | | |
|---|---|---|---|
| 13. | श्री. सुदाम परदेशी | निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे | जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे |
| 14. | श्री. मच्छिंद्र सुकटे (व्ही.सी.द्वारे) | निवासी उपजिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग |
| 15. | श्री. धनाजीराव धायगुडे | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर |
| 16. | श्री. अभिषेक पराडकर | उपायुक्त, पनवेल महानगरपालिका | पनवेल महानगरपालिका |
| 17. | डॉ. सागर घोलप | उपायुक्त, वसई विरार शहर मनपा | वसई विरार महानगरपालिका |
| 18. | श्री. सुहास गजे | सहायक आयुक्त | कल्याण डोंबिवली महानगरपालिका |
| 19. | श्री. सुदेश अं.परब | सहायक आयुक्त, परिमंडळ 1, नवी मुंबई | नवी मुंबई महानगरपालिका |
| 20. | श्री. तुषार जी. शिंदे | संचालक | एम.एम.आर.डी.ए. (MMRDA) |
| 21. | श्रीमती मनिषा प्रधान | मुख्य पर्यावरण अधिकारी, ठाणे | ठाणे महानगरपालिका |
| 22. | श्री एस.एन.रेड्डी (व्ही.सी.द्वारे) | उपवनसंरक्षक, सावंतवाडी | उप वनसंरक्षक, सावंतवाडी |
| 23. | प्रतिनिधी जिल्हाधिकारी, रत्नागिरी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी रत्नागिरी | जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी |
| 24. | श्री. जगदीश वालंजुवानी | उप अधीक्षक, मीठागरे | मीठागरे विभाग, बलार्ड इस्टेट, मुंबई |
| 25. | श्री. प्रविण साळुंके | मुख्य वास्तुविशारद व नियोजनकार | म्हाडा कार्यालय |
| 26. | श्री. रवीकुमार केव्हीआरके | मुख्य नियोजनकार, सिडको | सिडको कार्यालय (CIDCO) |
| 27. | श्री. जगदीश पाटील | वरिष्ठ नियोजनकार (पर्यावरण), सिडको | सिडको कार्यालय |
| 28. | श्री. प्रकाश ठाकूर | उप संचालक, नगर रचना, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचे कार्यालय, बांद्रा |
| 29. | उप निबंधक अधिकारी (S.R.O) रत्नागिरी | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | उप निबंधक अधिकारी (S.R.O) रत्नागिरी |
| 30. | श्री. राहुल एकनाथ मुंडके | उप विभागीय अधिकारी, पनवेल, रायगड | जिल्हाधिकारी रायगड यांचे प्रतिनिधी |
| 31. | श्री. शरद बोटके | महसूल सहायक, मुंबई उपनगर | जिल्हाधिकारी कार्यालय मुंबई उपनगर |
| 32. | श्री. अनिल द. क्षीरसागर | कार्यकारी अभियंता (पर्यावरण) | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| 33. | श्री. अजय रा.पाटणे | कार्यकारी अभियंता (SWM) Z-IV | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| 34. | श्री. चंदन दे. डोंगरे | सहायक अभियंता (SWM) | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| 35. | श्री. तन्मय बोरे | कनिष्ठ अभियंता, नगर रचना विभाग | वसई-विरार मुख्यालय |
| 36. | श्री. प्रतिक सुनिल भोसले | कनिष्ठ अभियंता | एम.एम.आर.डी.ए. (MMRDA) |
| 37. | श्री. शिव जे. मुरा | उप अभियंता (पर्यावरण) | कल्याण डोंबिवली महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| 38. | श्री. संजय डी. पाटील | वरिष्ठ नियोजक | एम.आय.डी.सी. (MIDC) मुंबई |
| 39. | श्री. संजोग शेलार | उप नियोजनकार | एम.आय.डी.सी.(MIDC) पनवेल |
| 40. | श्री. पुरुषोत्तम जाधव | उप वास्तुविशारद | एम.आय.डी.सी.(MIDC) |
| 41. | श्री. जितेंद्र जगदाळे | सहायक पोलिस आयुक्त, ठाणे शहर | सहायक पोलिस आयुक्त, ठाणे शहर |
| 42. | श्री. समीर शेख | पोलीस निरीक्षक | मीरा भाईंदर पोलीस आयुक्तालय |
| 43. | श्री. संतोष वेजनाथ केंद्रे | पोजीस निरीक्षक | गोराई पोलीस ठाणे |
| 44. | श्री. नितिन विजयकर | पोलीस निरीक्षक | ठाणे ग्रामीण एस.पी. |
| 45. | श्री. संजय बा. सावंत | पोलीस उपअधीक्षक (गृह) | |
| 46. | श्री. मारूती बबन हिरवे | पोलीस उप निरीक्षक | चारकोप पोलीस ठाणे |
| 47. | श्री. जी.एल.सदाफुले | पोलीस उप निरीक्षक | विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई |
| 48. | श्री. देवरे भुषण केदर | पोलीस उप निरीक्षक | एम.एच.बी.कॉलनी पोलीस ठाणे |
| 49. | श्री. धनाजी बी. क्षीरसागर | स.पो.आ.पोर्ट व.विभाग | नवी मुंबई पोलीस आयुक्तालय |
| 50. | श्री. स्वप्नील द. दळवी | सहायक नगररचनाकार | कल्याण डोंबिवली महानगरपालिका |
| 51. | श्री. पी.के.मिराशे | सल्लागार (पर्यावरण) | एम.आय.डी.सी. (MIDC) मुंबई |
| 52. | श्री. निलेश दा. संगारे | सर्वेअर | एम.आय.डी.सी.(MIDC) पनवेल |
| 53. | श्रीमती सुवर्णा जाधव | क्षेत्रीय अधिकारी | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, ठाणे |
| 54. | श्रीमती रूपाली सोनकांबळे | - | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ |
| 55. | श्री. संजय शिंदे | (व्ही.सी.द्वारे) | - |
| 56. | श्री. जयराज कारभारी | - | - |
| 57. | श्री. स्टॅलिन डी. | संचालक, वनशक्ती | वनशक्ती |
| 58. | श्रीमती. हेमा रमाणी | सदस्य, बॉम्बे एन्व्हारमेंट ऍक्शन ग्रुप | बॉम्बे एन्व्हारमेंट ऍक्शन ग्रुप |

- व्हि.सी. मधील उपस्थित काही सदस्यांचे नाम / पदनामाचा बोध होत नसल्यामुळे फक्त नावांची नोंद केलेली आहे.

## कांदळवन समितीच्या तक्रारींवर केलेली कार्यवाही

| अ.क्र | तक्रार क्र. व तक्रारीचा विषय | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| | | **मुंबई उपनगर जिल्हयातील कांदळवन तक्रारी** | |
| 1 | तक्रार क्र.12 श्री. लुक मेन्डीस<br>दि.30.11.2018<br>Mangroves under threat at Bandra east below Mahim-Sion link way. | • **मा.अध्यक्ष यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका यांना डेब्रिज काढण्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना सादर करावा. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी आठ दिवसात आवश्यक कार्यवाही करुन पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करावा.** | 1. बृहन्मुंबई महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| 2 | तक्रार क्र.21 श्री.बी.एन.कुमार व श्री. नंदकुमार पवार<br>दि.09.12.2018<br>Sion Panvel Highway work damaging Mangroves. | • **मा.अध्यक्ष यांनी तक्रार क्रमांक 21 बद्दल सॉल्ट पॅन विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागास जमीन हस्तांतरण केल्याचे पत्र जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालयास सादर करुन त्याची प्रत समितीस सादर करावी.**<br>• **तसेच या दोन्ही तक्रारींबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी तक्रारदार तसेच उपायुक्त, (विशेष) बृहन्मुंबई महानगरपालिका आणि उप विभागीय अधिकारी, पूर्व उपनगर यांची संयुक्त स्थळपाहणी होऊन पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे आश्वासन दिले.** | 1. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग<br>2. सॉल्ट पॅन विभाग<br>3. बृहन्मुंबई महानगरपालिका |
| 3 | तक्रार क्र.83 श्री.बी.एन.कुमार<br>दि.01.08.2018<br>Mangrove killing along Sion-Panvel highway - Request for rapid action force. | | |
| 4 | तक्रार क्र.118 श्री. हरीश पांडे<br>दि.25.01.2020<br>Large scale CRZ 1 reclamation & mangroves destruction in Ganpat Patil Nagar in Dahisar, Mumbai. | • जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या दि.24.08.2022 रोजीच्या अहवालानूसार नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांनी मा.उच्च न्यायालय यांचेकडील O.O.C.J. PIL writ petition No. 15/2010 च्या अनुषंगाने जमिनीचा मोजणी अहवाल कोणासही देण्यास कोणतेही कार्यवाही करणेस मनाई असल्याने सदर जागेची मोजणी तुर्तास करता येणार नाही, असे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयास कळविले असल्याचे नमूद केले आहे. सदर मताशी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर सहमत असल्याचे नमूद केले आहे.<br>• त्याअनुषंगाने समितीने सदर जागेची गुगल अर्थद्वारे तपासणी केली असता सदर ठिकाणी सन 2010 नंतर ही कांदळवनाची तोड करुन अतिक्रमण होत असल्याने संबंधितांवर गुन्हा दाखल करुन 2010 नंतर झालेल्या | 1. बृहन्मुंबई महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अतिक्रमणाबाबत नियमोचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.<br>• **मा.अध्यक्ष यांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना उप विभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांनी स्थळपाहणी करुन आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दयावेत व अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या.** | |
| 5 | श्रीम.आदिती प्रधान.<br>तक्रार क्र. 69<br>Debris dumping in Lokhandwala Mangrove in Andheri West.<br>दि.20.04.2019 | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या दि.12.02.2020 रोजीच्या अहवालानूसार तक्रारीत नमूद ठिकाण हे मौजे वर्सोवा, ता.अंधेरी स.क्र.120 अ, येथील मिळकत "महाराष्ट्र हौसिंग बोर्ड" यांच्या मालकीची आहे. सदर ठिकाणी टाकण्यात आलेले डेब्रिस हे कांदळवन क्षेत्र व त्यापासून ५० मीटरच्या आत आहे.<br>• तद्नूसार मा.मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई तसेच आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेशी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालयाकडून पत्रव्यवहार करण्यात आला आहे.<br>• तद्नूसार मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा यांच्या दि.08.06.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर तक्रारीच्या अनुषंगाने मौजे – वर्सोवा, ता. अंधेरी येथील स.न.120, न.भू.क्र.1374 अ या ठिकाणी स्थळपाहणी करण्यात आली असून दि.16.03.2023 रोजीचा पंचनामा, संबंधित जागेचे छायाचित्रे समितीस पाठविण्यात आलेली आहेत. सदर ठिकाणी टाकण्यात आलेले डेब्रिज हे कांदळवन क्षेत्रात टाकण्यात आलेले असल्याचे नमूद केले आहे.<br>• **या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी तात्काळ एफ.आय.आर दाखल करावा आणि सदर प्रकरणी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी झालेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीत सादर करण्याच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या.** | 1. बृहन्मुंबई महानगरपालिका<br>2. मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा |
| 6 | श्री. स्टॅलिन डी. तक्रार क्र. 160<br>Request to respect Municipal Commissioner Carter Road at Bandra Mangrove pollution.<br>दि.18.10.2021 | • जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे दि.23.08.2022 रोजीच्या अहवालानुसार सदर जागेवर फरशीचे तुकडे, डांबर गोळे, प्लॅस्टिकचे तुकडे इ. भराव निदर्शनास आले आहे.<br>• त्याअनुषंगाने कांदळवन व समुद्रकिनारी क्षेत्रात झालेली भरणी / भराव काढून टाकून सदर ठिकाण पुर्ववत करणेबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका यांना दि.05.01.2022 रोजीच्या पत्रान्वये तसेच उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) | बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई |

| | | | |
|---|---|---|---|
| | | बृहन्मुंबई महानगरपालिका यांना दि.06.07.2022 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.<br>• **याअनुषंगाने मा.अध्यक्ष यांनी उपायुक्त, (विशेष) बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सदर क्षेत्रात झालेली भरणी काढून टाकण्यासाठी ठोस नियोजन पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश दिले. यासंबंधी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी झालेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीत सादर करण्याच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या.**<br>• **तसेच सर्व महानगरपालिका यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील कांदळवन क्षेत्रात टाकलेला भराव काढण्यासाठी ठोस नियाजन पुढील बैठकीपूर्वी सादर करावे यासाठी सदस्य सचिव यांनी पत्र सादर करण्याच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या.** | |
| 7 | तक्रार क्र.181 श्री. अमजद खान – 21.02.2022 – मौजे एरंगळ गाव, मालाड (प) ता. बोरीवली जि. मुंबई उपनगर येथील (CTS) भू.क्र. २०५३-सी, २०५३-सी, २०५५-अे, २०५४, २०५५-डी, २०५३-ई, २०५३-डी, १९६५, २०५५, २०५५-सी या जागेवर कांदळवनापासून १ मीटर परिसराचे आत रहेजा बिल्डर्स या विकासकामार्फत रहेजा एक्सोटिका बिल्डींग नं. ९ अ, बिल्डींग नं. ९ ब, सीएचई-९४५४-बीपी/डब्लुएस/अेपी या इमारतीचे बांधकाम करुन मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशाचा अवमान केलेबाबत. | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचा दि.05.06.2023 रोजीच्या अहवालानूसार तक्रारीतील नमूद क्षेत्र अधिसूचित कांदळवनाचा भाग नाही. तसेच MRSAC नकाशानूसार सदर क्षेत्रावर बांधण्यात आलेल्या 3 इमारती या सन 2005 नंतर बांधलेल्या दिसून येत आहे व कांदळवनापासून 50 मी.च्या बाहेर आहे. तसेच जी.पी.एस.रिंडींग क्र.4 च्या ठिकाणी असलेली भितीचे बांधकाम मढ प्लॉट पासून 50 मी. आत येत आहे. परंतु, सदर पत्र्याचे बांधकाम सन 2005 च्या आधीपासून असल्याचे दिसून येत आहे.<br>• सदर मिळकत ही खासगी मिळकत असल्याने तहसीलदार बोरीवली यांनी दि.01.03.2023 रोजीच्या पत्रान्वये या खासगी मिळकतीवर डेब्रीजची मोठ्या प्रमाणावर भरणी केल्याने संबंधितांवर MRTP कायद्यानुसार योग्यती कार्यवाही करण्यास सहा. आयुक्त, पी/ उत्तर विभाग यांना कळविले असल्याचे नमूद केले आहे.<br>• **या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी कांदळवनाचा ऱ्हास नसल्याने तक्रार निकाली काढण्याचे सूचना दिली तसेच सदर बाब तक्रारदारास कळवण्यास सांगितले.** | बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई |

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | तक्रार क्र. 193 श्री. योगेश केणी –दि.15.07.2022<br>CTS No. 1583 मालवणी गाव साई दर्या ढाबाच्या मागे मार्वे रोड मालवणी चर्च, मालाड पश्चिम, मुंबई येथे कॉन्ट्रॅक्टर यांच्याद्वारे सरकारी जागेवर अतिक्रमण करीत, सदर जागेवर असलेल्या मॅग्रोजच्या झाडाची मोठया प्रमाणात कत्तल करुन तेथे बेकायदेशीर भराव करुन त्यावर बनविलेले अंदाजे 3000 चौ. फुटाचे सिमेंट विटाचे डब्बल माळयाचे पक्के अनधिकृत बांधकाम निष्कासन करण्याबाबत. | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचा दि.06.06.2023 रोजीच्या अहवालानुसार सरकारी जागेवर अतिक्रमण केलेबाबत अतिक्रमणदार श्री. धनेश कोळ यांचेवर मालवणी पोलीस ठाणे येथे भारतीय दंड संहिता 1960 मधील कलम 441, 447 अन्वये तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 120 अन्वये गु.र.क्र.1273/2021 दि. 25.09.2021 अन्वये गुन्हा दाखल करणेत आलेला आहे.<br>• सदर जागेवरील अतिक्रमणे निष्कासीत करणेबाबत प्र. उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) मालाड यांना तहसिलदार बोरीवली यांनी दि.08.06.2022 व दि.02.02.2023 रोजीच्या पत्रान्वये कळविले असल्याचे नमूद केले आहे.<br>• प्रकरणी तक्रारीत नमूद क्षेत्र अधिसूचित राखीव कांदळवनाचा भाग नसून सदर जागेवर सन 2005 व सद्यस्थितीत कांदळवन दिसून येत नाही. तसेच सदरचे क्षेत्र अधिसूचित राखीव कांदळवनापासून 50 मी. च्या बाहेर येत असल्याने प्रस्तुत तक्रार निकाली काढण्याची विनंती केली आहे.<br>• **या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे शिफारसी नुसार तक्रार निकाली काढण्याचे सूचना दिल्या. तसेच सदर बाब तक्रारदारास कळवण्यास सांगितले.** | - |
| 9 | तक्रार क्र. 196 श्रीमती श्वेता वाघ – दि. 22.09.2022 Dumping of debris, and destruction of mangrove habitat in versova near KPS memorial school. | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या दि.31.03.2023 रोजीच्या अहवालानूसार तक्रारीत नमूद ठिकाण राखीव वन म्हणून अधिसूचित झालेली असून सदर मिळकतीचा ताबा दि.09.04.2021 रोजी वनविभागाकडे हस्तांतरित करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी वनविभागामार्फत गु.क्र.E/34/2021-22, दि.23.10.2021 अन्वये वनगुन्हा नोंदवण्यात आला आहे. जागेवर रस्त्याचे काम चालू असताना 1 डंपर व 2 जे.सी.बी. ही वाहने जप्त करण्यात आली आहेत. प्रकरणी वनविभागामार्फत पुढील कार्यवाही सुरु असल्याबाबत नमूद केले आहे.<br>• **या अनुषंगाने विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ., कुर्ला यांनी आवश्यक कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ., कुर्ला |
| 10 | तक्रार क्र. 202 श्री.रेजी अब्राहम, मुंबई<br>Destruction of Mangroves on | • विभागीय वन अधिकारी यांचे दि.06.04.2023 रोजीच्या अहवालानुसार तक्रार अर्जातील नमुद क्षेत्र हे मौजे एक्सर स.क्र. 85/3, 85/5 मधील आहे. सदर क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्र नाही. तक्रार अर्जातील क्षेत्र हे या विभागाच्या | 1. बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई |

| | | | |
|---|---|---|---|
| | 40 plus acres of govt land at prime location in borivali dahisar belt off Link Road. Date:29.11.2022 | कार्यक्षेत्राच्या बाहेर असल्याने तहसिलदार बोरीवली व तक्रारदार रेजी अब्राहम यांना कळविले असल्याचे नमूद केले आहे.<br>• जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे दि.28.07.2023 रोजीच्या अहवालानूसार मौजे एक्सर, ता. बोरीवली येथील स.क्र.221पै, न.भू.क्र.532पै येथील दहिसर बेल्ट येथील ई-स्काय क्लब या ठिकाणी भरणी करुन कांदळवनाचा ऱ्हास केल्याबाबत पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, 1986 मधील कलम 15 (1) (2) अन्वये मंडळ अधिकारी बोरीवली यांनी एम.एच.बी. कॉलनी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्र. 0292/2023, दि.01.07.2023 अन्वये ज्ञानेश कमलाकर सामंत यांचेवर गुन्हा दाखल करणेत आलेला आहे. प्रकरणी मौजे एक्सर, ता.बोरीवली येथील स.न.221 पै न.भू.क्र. 532 पै ही मिळकत खाजगी मालकीची असून त्यावर कच्चे ताडपत्रीचे व बांबुचे अंदाजे 10 ते 12 गोडाऊन दिसून आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• प्रकरणी सदर जागेवरील अनधिकृत बांधकामाविरुध्द नियमानूसार कार्यवाही करणेकामी या कार्यालयाकडील दि.28.07.2023 रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक आयुक्त, (आर/उत्तर) दहिसर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना कळविण्यात आलेले आहे.<br>• **सदर प्रकरणी उपायुक्त, (विशेष) बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी तात्काळ अतिक्रमण आणि बांधकाम काढून पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 11 | तक्रार क्र. 204 श्री.अली असगर मोहमद तहसिलदार, मालाड मालवणी परिसरातील कांदळवन नष्ट करणारे भुमाफिया व महानगरपालिकेचे खाजगी ठेकेदार यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई होणेबाबत.<br>दि : 07.11.2022 | • पोलीस उप आयुक्त (अभियान), पोलीस आयुक्त यांचे कार्यालय यांचे दि.05.08.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर तक्रारीबाबत मालवणी पोलीस ठाणेस गुन्हे नोंद करण्यात आले असून सदर गुन्हयांचा तपास करण्यात येत आहे. तसेच अर्जदार श्री.अली असगर मोहम्मद तहसिलदार यांना नमूद केलेल्या गुन्हयांबाबत माहिती दिली असता, त्यांनी समाधान व्यक्त करुन तक्रारीबाबत त्यांची सध्या कोणतीही तक्रार नसून त्यांनी केलेला तक्रार अर्ज दप्तरी दाखल करण्यास त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे सांगितले आहे. परिमंडळ 11 मधील समुद्र किनाऱ्या व खाडी लगत असलेल्या पोलीस ठाणेस, कांदळवन संदर्भात प्राप्त तक्रारीबाबत गुन्हे दाखल करुन तपास करण्यात येत आहे. | 1. पोलीस आयुक्त, मुंबई शहर<br>2. बृहन्मुंबई महानगरपालिका<br>3. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>4. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • **या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश दिले.** | |
| 12 | तक्रार क्र. 206 श्रीमती. श्वेता भट Destruction of Mangroves by way of construction of walls at creeks along the Malad Marve road area, Malad West.<br>दि : 21.12.2022 | • विभागीय वन अधिकारी यांचे दि.06.04.2023 रोजीच्या अहवालानुसार तक्रार अर्जातील क्षेत्र हे मालवणी व वळणई येथील आहे. सदर क्षेत्र हे अधिसूचित कांदळवन क्षेत्र नाही. तक्रार अर्जातील क्षेत्र 50 मी. आत बफर झोन मध्ये येत आहे. त्याअनुषंगाने तहसिलदार बोरीवली यांना उचित कार्यवाहीसाठी कळविले असल्याचे नमूद केले आहे.<br>• जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे दि.01.08.2023 रोजीच्या अहवालानूसार प्रकरणी मौजे वळणई, ता. बोरीवली येथील खाडी लगत मिळकतीची दि.24.03.2023 रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी, मुं.कां.सं.घ. पश्चिम मुंबई यांनी तलाठी साझा मालवणी यांचे समवेत स्थळपहाणी करुन अहवाल सादर केला आहे. तक्रारीतील नमूद ठिकाण हे अधिसूचित राखीव कांदळवनाचा भाग नाही. तसेच सन 2005 साली व सद्यस्थितीत कांदळवन नाही. परंतु सदरचे क्षेत्र हे कांदळवनापासून 50 मीटरचे आत येत आहे. त्याअनुषंगाने तहसिलदार बोरीवली यांनी मौजे वळणई, ता. बोरीवली येथील मालाड मार्वे रोड परिसरात कांदळवन पासून 50 मीटर अंतराचे आत काँक्रीट भिंत बांधल्यामुळे मंडळ अधिकारी, मालवणी यांनी बांगुर नगर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्र. 0354, दि. 06.07.2023 अन्वये अज्ञात इसमा विरुध्द गुन्हा दाखल करणेत आलेला आहे.<br>• **या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी उपायुक्त, (विशेष) बृहन्मुंबई महानगरपालिका यांना भिंत तोडून पाण्याचा प्रवाह पुर्ववत करण्याचे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश दिले.** | 1. बृहन्मुंबई महानगरपालिका |
| 13 | तक्रार क्र.207 श्री. झोरु भातेना, मुंबई दि. 06.01.2022<br>जुहू कोळीवाडा बीच या ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास व अतिक्रमण झाले असल्याबाबत. | • विभागीय वन अधिकारी यांचे दि.04.07.2022 रोजीच्या अहवालानूसार तक्रारीतील नमूद क्षेत्रातील अतिक्रमणाबाबत महसूल विभागाकडून दि.01.04.2022 रोजी FIR 0251 अन्वये सांताक्रुझ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आले आहे. त्यामुळे या विभागाकडील सदर तक्रार निकाली काढण्याबाबत विनंती केली आहे.<br>• **या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी उपायुक्त, (विशेष) बृहन्मुंबई** | 1. बृहन्मुंबई महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर<br>3. MCZMA |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **महानगरपालिका यांना कार्यवाही करुन पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.** | |
| 14 | तक्रार क्र.216 श्री.सुमित अशोक धुरी.<br>Merciless killing of Mangroves, illegal reclamation & encroachment of Forest land and constructions.<br>दि. 26.02.2023 | • **सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी सदर जागा वन विभागास हस्तांतरित केल्याचे सांगितले.**<br>• **या अनुषंगाने मा.अध्यक्ष यांनी विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.** | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |
| 15 | तक्रार क्र.217 श्रीमती गुंजन गुप्ता.<br>Burning of Mangroves in Malad West (Near Mindspace/Evershine Nagar)<br>दि. 27.02.2023 | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे दि.24.07.2023 रोजीच्या अहवालानूसार प्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांचेकडील पत्र, दि.24.04.2023 अन्वये तक्रारीतील नमूद क्षेत्र अधिसूचित राखीव कांदळवनाचा भाग नाही. सदरचे क्षेत्र हे खाजगी कांदळवन क्षेत्र असून MRSAC नकाशानूसार सदर जागेवर सन 2005 साली कांदळवन दिसून येते. परंतु सद्यस्थितीत कांदळवन दिसून येत नाही. सदर क्षेत्राची पाहणी केली असता, सदर ठिकाणी इंजायली झाडे झुडपे दिसून येत आहेत व सदर ठिकाणी आग लागण्याच्या छोटया-छोटया खुणा दिसून आल्या. तसेच सदर ठिकाणी कोठेही कांदळवनाची तोड अथवा ऱ्हास झाल्याचे दिसून आले नसल्याने तहसीलदार बोरीवली यांचे अहवालानूसार नमूद केले आहे.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना सदर तक्रारीबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| 16 | तक्रार क्र.221 श्री.स्टॅलिन डी.<br>Illegal construction of toilet block in ESZ are next to forest boundary and in CRZ.<br>दि. 13.03.2023 | • **सदर तक्रारी संदर्भात बैठकीत झालेल्या चर्चे दरम्यान तक्रारदार तथा समिती सदस्य श्री. स्टॅलिन डी. यांनी सदरचे बेकायदेशीर शौचालय काढून त्याऐवजी पोरटेबल शौचालय बसविल्याचे सांगितले. त्यामुळे तक्रारदार यांनी तक्रार निकाली काढण्याची विनंती केली असल्याने मा.अध्यक्ष यांनी सदर तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले.** | - |

| | | | |
|---|---|---|---|
| 17 | तक्रार क्र.227 Switsy Henriques, Borivali Gorai Police station fails to accept FIR against mangroves being cut. दि. 13.04.2023 | • **या प्रकरणी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना सदर तक्रारीबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, मुंबई |
| 18 | तक्रार क्र.228 श्रीमती भाविता दुंगार दि. 11.04.2023 व श्री.अभिषेक कदम दि. 06.04.2023 Encrochment in CRZ and Forest areas near Marve Road. | • **या प्रकरणी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी उपायुक्त, (विशेष) बृहन्मुंबई महानगरपालिका यांना कार्यवाही करण्याचे निर्देश दयावेत. तसेच, झालेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हाधिकारी मुंबई उपनगर पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | 1. बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यकअभियंता (घ.क.व्य.), पी/उत्तर<br>2. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| 19 | तक्रार क्र.229 श्रीमती मिली शेट्टी Fire on Mangrove at charkop Sector 8. दि. 28.04.2023. | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे दि.01.08.2023 रोजीच्या अहवालानूसार प्रकरणी मौजे चारकोप, ता.बोरीवली, न.भू.क्र.3/अ/1 येथील साई सिध्दी अपार्टमेंट या ठिकाणी अधिसूचित राखीव कांदळवन क्षेत्राचा भाग नाही. परंतू अधिसूचित राखीव कांदळवन क्षेत्रापासून 50 मीटरचे आत येत आहे. सन 2005 साली सदर ठिकाणी कांदळवन नव्हते. तसेच सद्यस्थितीत देखील सदर ठिकाणी कांदळवन दिसून येत नाही. तक्रारीतील नमुद ठिकाणी स्थळपहाणी केली असता सदर ठिकाणी कांदळवनालगत टाकलेल्या कचऱ्याला आग लागल्याचे दिसून आले. तसेच पाहणी वेळी कुठेही कांदळवनाला आग लागल्याचे दिसून आले नाही. तसेच कांदळवन तोड झाल्याचे दिसून येत नाही. प्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांचेकडील दि.04.07.2023 रोजीच्या अहवालात नमूद केले नुसार अधिसूचित राखीव कांदळवन क्षेत्रापासून 50 मीटरच्या आत जागेवर कचऱ्याच्या ढिग टाकल्याने पर्यावरण संरक्षण अधियिम 1986 चे कलम 15 (1) व (2) अन्वये मंडळ अधिकारी, बोरीवली यांनी चारकोप पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्र.0315, दि.15.07.2023 अन्वये अज्ञात इसमा विरुध्द गुन्हा दाखल करणेत आलेला आहे, असे नमूद केले आहे. | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • **या प्रकरणी बैठकीत झालेल्या चर्चेनंतर मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे तक्रार निकाली काढण्यात येत आहे. तथापि सहायक पोलीस आयुक्त, मुंबई पोलीस यांना सेक्टर 8, चारकोप येथे गस्त वाढवून कांदळवन क्षेत्रात कचरा टाकण्यास प्रतिबंध करावा असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 20 | तक्रार क्र.230 श्री.राहुल एम व श्री.झायलीया सेलवम Enchoachment happening on the mangroves in charkop sector 8 behind Sun Rise building. दि. 14.04.2023 | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे दि.01.08.2023 रोजीच्या अहवालानूसार प्रकरणी मौजे चारकोप, ता. बोरीवली येथील स.नं.39, न.भू.क्र.4 या भूखंडाची दि.17.05.2023 रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी, मुं.कां.सं.घ, पश्चिम मुंबई यांनी मंडळ अधिकारी, बोरीवली व तलाठी सझा कांदिवली यांचे समवेत स्थळपहाणी केली असता, सदर तक्रारीत नमूद ठिकाण हे अधिसुचित राखीव कांदळवनाचा भाग नाही. परंतु सदरचे क्षेत्र हे कांदळवनापासून 50 मीटरचे आत येत आहे. सदर मिळकतीवर कांदळवनालगत अंदाजे 20 ते 25 कच्चा स्वरुपच्या झोपडया आहेत. जागेवर स्थळपहाणी दरम्यान कोठेही कांदळवनाची तोड नाही किंवा नव्याने भरणी झाल्याचे दिसून आलेले नाही. त्याअनुषंगाने मौजे चारकोप, ता.बोरीवली येथील स.नं.39, न.भू.क्र.4 या शासकीय मिळकतीवर कांदळवनापासून 50 मीटर चे आत (बफर झोन) मध्ये अतिक्रमण करुन झोपडयांचे बांधकाम केल्याने मंडळ अधिकारी, बोरीवली यांनी चारकोप पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्र. 0259, दि.30.06.2023 अन्वये सुनील लालजी वर्मा व इतर 12 यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे, असे नमूद केले आहे.<br>• **या प्रकरणी बैठकीत झालेल्या चर्चेनंतर मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे सदर तक्रार निकाली काढण्यात येत आहे. तथापि सहायक पोलीस आयुक्त, मुंबई पोलीस यांना सेक्टर 8, चारकोप येथे गस्त वाढवून कांदळवन क्षेत्रात कचरा टाकण्यास प्रतिबंध करावा असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |
| 21 | तक्रार क्र.232 श्री.रेजी अब्राहम Large Scale ongoing rabid dumping & illegal construction on adjacent | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे दि.11.07.2023 रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकरणी दि.24.04.2023 रोजीच्या लोकमत (हॅलो मुंबई) या वर्तमान पत्रामध्ये मौजे चारकोप याठिकाणी खाडीजवळ कांदळवनाची कत्तल करुन बांधकाम होत असलेबाबतची बातमी प्रसिध्द झालेली आहे. सदर बातमीच्या अनुषंगाने | 1. बृहन्मुंबई महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |

| | | | |
|---|---|---|---|
| | huge govt plots next to charkop creek at charkop sector 8 to build unapproved illegal chawls.दि. 21.04.2023 | मा. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांनी सुमोटो केस दाखल करुन घेऊन दि.25.04.2023 रोजी सुनावणी घेऊन सदर सुनावणी दरम्यान संबंधित विभागांना नोटीस बजावणेकामी निर्देशित केलेले होते. तसेच सदर प्रकरणी दि.07.06.2023 रोजी सुनावणी आयोजित केलेली होती.<br>• त्याअनुषंगाने नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांनी उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांना दि.01.06.2023 रोजी सादर केलेल्या अहवालानुसार, प्रकरणी तक्रारीत नमूद बांधकाम हे नगर भूमापन चारकोप, ता.बोरीवली येथील न.भू.क्र.2 (स.क्र.42) मध्ये येत असून सदर मिळकतीचे दक्षिणेकडील बाजूस येत असल्याचे नमूद केले आहे. तसेच सहा.आयुक्त, आर/दक्षिण, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांना दि.05.06.2023 रोजी सादर केलेल्या अहवालानूसार, प्रकरणी नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांनी चारकोप, न.भू.क्र.2 या मिळकतीचा नकाशात दर्शविलेल्या स्थानानूसार सदरचे बांधकाम हे सीआरझेड ने प्रभावित होत नसल्याचे दिसते. तसेच वर नमूद केलेले निरीक्षण हे सी.आर.झेड. च्या मुद्दयांपुरते मर्यादित असून त्याच्या मालकीचा संदर्भ न घेता तसेच बांधकामाच्या स्थितीची पडताळणी न करता केवळ सी.आर.झेड. दृष्टीकोनातून दिलेला आहे, असे नमूद केले आहे.<br>• **या प्रकरणी बैठकीत झालेल्या चर्चेनंतर मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे सदर तक्रार निकाली काढण्यात येत आहे. तथापि सहायक पोलीस आयुक्त, मुंबई पोलीस यांना सेक्टर 8, चारकोप येथे गस्त वाढवून कांदळवन क्षेत्रात कचरा टाकण्यास प्रतिबंध करावा असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 22 | तक्रार क्र.236 श्री. संजय सिंघ गणपत पाटील नगर, CTS No. 532, सर्व्हे नं. 221, एक्सार विलेज, न्यू लिंक रोड, दहिसर पश्चिम येथील तक्रारीबाबत. दि.23.03.2023 | • मा.अध्यक्षांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर, विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |

| | | | |
|---|---|---|---|
| 23 | तक्रार क्र. 250<br>श्री. सुमित अशोक धुरी<br>No Action Taken so far for Request regaring quashing of Building permissions, Fire NOC and stringent action for large scale construction in CRZ area. दि.27.06.2023. | • विभागीय वन अधिकारी यांचे दि.28.07.2023 रोजीच्या अहवालानूसार सदरचे ठिकाण हे मौजे ओशिवरा न.भु.क्र. 1/38/2 येथील आहे. सदर क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्र नाही व वन विभागाच्या ताब्यात नाही. सन 2005 साली नमूद जागेवर कांदळवन दिसून येत नाही. तसेच सद्यस्थितीतही नमूद जागेवर कांदळवन नाही. तक्रारीतील नमूद क्षेत्र हे कांदळवनापासून 50 मी. आतील बफर झोन मध्ये येत आहे. त्यामुळे सदर तक्रार अर्जावर महसुल व बृहन्मुंबई महानगरपालिका विभागामार्फत कार्यवाही होणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी उपायुक्त, (विशेष) बृहन्मुंबई महानगरपालिका यांना कार्यवाही करण्याचे निर्देश दयावेत. तसेच, झालेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हाधिकारी मुंबई उपनगर पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले. तसेच संबंधित कार्यक्षेत्र असलेल्या पोलीस विभागाने सदर क्षेत्रात गस्त वाढवण्याचे निर्देश दिले.** | 1. बृहन्मुंबई महानगरपालिका |
| 24 | तक्रार क्र. 251 श्री. अजित गोम्स<br>Destruction of Mangroves near Chheda Nagar – Chembur दि.29.06.2023. | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 12.07.2023 रोजीच्या पत्रान्वये संबंधित अधिकारी यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे. तथापि, अहवाल अप्राप्त आहे. | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |
| 25 | तक्रार क्र.255 श्री. सुमित अशोक धुरी<br>Complaint regarding shameless and merciless killing of Mangroves, illegal reclamation & encroachment of Forest land and construction of concrete wall and piling activities near stellar school at MHADA, Four Bungalows, Andheri - | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 01.08.2023 रोजीच्या पत्रान्वये संबंधित अधिकारी यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे. तथापि, अहवाल अप्राप्त आहे. | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |

| | | | |
|---|---|---|---|
| | W, Mumbai दि.18.07.2023. | | |
| 26 | तक्रार क्र.259 श्री.धिरज परब मुंबईच्या गोराई येथील एस्सेल वर्ल्ड/ पॅन इंडिया या व्यावसायिक कंपनीने स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी कटकारस्थान करुन कित्येक एकर जागेतील कांदळवन नष्ट करुन पर्यावरणाची हानी केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करणे, केलेला भराव, बांध व बांधकामे काढून टाकून त्याचा खर्च तसेच पर्यावरणाची हानी केल्याची नुकसान भरपाई वसूल करणे तसेच पुन्हा खाडीच्या प्रवाहाचे नैसर्गिक मार्ग खुले करुन कांदळवन लागवड करणेबाबत. | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 09.08.2023 रोजीच्या पत्रान्वये संबंधित अधिकारी यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे. तथापि, अहवाल अप्राप्त आहे. | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |
| 27 | तक्रार क्र.261 श्रीमती रोझी डिसूजा<br>Borivali & Gorai Jetty needs attention urgently.<br>दि.18.08.2023. | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 24.08.2023 रोजीच्या पत्रान्वये संबंधित अधिकारी यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे. तथापि, अहवाल अप्राप्त आहे. | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी, कुर्ला |
| 28 | तक्रार क्र. 263 श्री. संतोष पुजारी Land Graber / Land Mafia Bans Bahadur Jaiswal are busy in filling Talav (Pond) with Debris & Encroaching Government Land.<br>दि.20.08.2023. | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 30.08.2023 रोजीच्या पत्रान्वये संबंधित अधिकारी यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे. तथापि, अहवाल अप्राप्त आहे. | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी |

| | | | |
|---|---|---|---|
| 29 | तक्रार क्र. 264 श्री. रेजी अब्राहम Regarding inaugurate "West View Garden" created Post rabid dumping & brazen destruction of Mangroves by rabid dumping & other illegal procedures on notifified mangroves forest area admeasuring 5000 odd sq.ft. at charkop Kandivali west. दि.17.08.2023. | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 04.09.2023 रोजीच्या पत्रान्वये संबंधित अधिकारी यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे. तथापि, अहवाल अप्राप्त आहे. | 1. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. विभागीय वन अधिकारी |

| अ. क्र. | तक्रारदार व तक्रारीचा विषय | सविस्तर तपशील | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| | | **ठाणे जिल्ह्यातील कांदळवन तक्रारी** | |
| 30 | तक्रार क्र. 17 श्री. धिरज परब, दि.05.12.2018<br>सेव्हन इलेव्हन हॉटेल कं. ने मिरा रोड कनकिया येथे कांदळवनाची तोड करुन माती भराव व कुंपण भिंत बांधकाम केल्याबाबत. | • जिल्हाधिकारी ठाणे यांचे दि.06.06.2022 रोजीच्या प्राप्त अहवालाचे अवलोकन केले असता, विषयांकित प्रकरणी उपविभागीय अधिकारी, ठाणे उपविभाग, ठाणे यांच्या वस्तुस्थितीदर्शक अहवालानुसार मौजे नवघर, ता. जि. ठाणे येथे कांदळवनाचा ऱ्हास झाला म्हणून यापूर्वी फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे दि.18.07.2023 रोजीच्या अहवालानूसार सर्व्हे क्र.51 हि. क्र.1, 2, 4/अ व 4/ब, सर्व्हे क्रमांक 68 हि. क्रमांक 1 व 3 व सर्व्हे क्रमांक 69 हि.क्र.1 या जागेवर झालेल्या विकासकामांबाबत संबंधितांवर मिरा-रोड पोलीस ठाणे येथे प्रभाग समिती कार्यालय क्र.04 चे सहा.आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांच्यामार्फत पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 चे कलम 15 अन्वये गुन्हा रजि. नं. 0224/2021 दि.18.06.2021 रोजी गुन्हा दाखल करणेत आले असल्याचे नमूद केले आहे. सोबत गुन्हा नोंद केल्याची प्रत जोडून देण्यात आली आहे.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे यांना सदर तक्रारीबाबत अंतिम अहवाल सादर करुन तद्नंतर तक्रार निकाली काढण्याचे मा.अध्यक्ष यांनी निर्देश दिले.** | जिल्हाधिकारी ठाणे |
| 31<br><br><br><br><br><br>32 | तक्रार क्र.9 श्री. जयेश गुप्ता – दि.24.11.2018<br>Destroying mangroves in the CRZ Creek ara of Sabe - Desai -Khardi, Thane.<br><br>तक्रार क्र. 201 श्री. स्टॅलिन डी.<br>Illegal dumping of waste in CRZ, pollution of air and water. Illegal Sand Mining.<br>Date : 29.09.2022 | • ठाणे महानगरपालिकेच्या दि.01.03.2023 रोजीच्या पुन:श्च प्राप्त अहवालानुसार मौजे खर्डी, दिवा येथील खाजगी मालकीचे भूखंड क्र.३७,३७,५०,५५, व ६१ यावर स्थानिक नागरीकांमार्फत मोठे खड्डे करण्यात आलेले होते त्या ठिकाणी कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आलेली आहे. दिवा डम्पिंग ग्राउंड येथे लिचेट संकलनाची व्यवस्था करण्यात आली होती व संकलित लिचेटची विल्हेवाट कौसा सांडपाणी प्रकिया केंद्र येथे लावण्यात येत होती. सदर खाडीमध्ये मासे मेल्याची कोणतीही तक्रार ठाणे महानगरपालिकेकडे प्राप्त नाही. पालिकेतर्फे दि.31.01.2023 पासून दिवा डम्पिंग ग्राउंड बंद करण्यात आलेले आहे तसेच मौजे भंडार्ली येथे घनकचरा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आलेला आहे. दिवा डम्पिंग ग्राउंड येथील Legacy Waste बाबत शासन निर्णयानुसार बायोरेमिडीएशन प्रकिया करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. दिवा | विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | डम्पिंग ग्राउंड येथील धुराचा त्रास कमी करण्यासाठी कायम स्वरूपी पाण्याच्या tanker ची व्यवस्था करण्यात आलेली आहे. पालिकेतर्फे 1200 TPD प्रती क्षमतेचा Waste to Energy प्रकल्पाचा टप्पा मार्च 2023 मध्ये सुरु करण्यात येत असून दुसरा टप्पा विजनिर्मिती डिसेंबर 2023 मध्ये सुरु करण्यात येणार आहे असे नमुद केले आहे.<br>• विभागीय वन अधिकारी यांच्या दि.06.04.2023 रोजीच्या प्राप्त अहवालानुसार तक्रार अर्जातील ठिकाण अधिसूचित कांदळवन क्षेत्र असल्यामुळे रौ.गु.क्र.-03/2023 दि.01.02.2023 अन्वये वनगुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील कार्यवाही चालू असल्याचे नमूद केले आहे.<br>• **या प्रकरणी विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना या तक्रारीबाबतचा अंतिम अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे मा. अध्यक्ष यांनी निर्देश दिले.** | |
| 33 | तक्रार क्र. 76 श्री. धिरज परब:- भाईंदर पश्चिम राधा स्वामी सत्संग व परिसरात पाणथळ, कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत. दि.23.04.2018 | • अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे दि.01.03.2023 रोजीच्या अहवालानुसार सदर क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्र नाही. सदर तक्रारीतील नमूद जागेवर 2005 साली कांदळवन नाही. परंतु सद्यस्थितीत सदर ठिकाणी कांदळवन दिसून येत आहे. तसेच सदर जागेवर डेब्रीज टाकून सपाटीकरण करून वाहन पार्किंगकरीता त्या जागेचा वापर करत असल्याचे दिसून येत आहे.<br>• कांदळवनांचा ऱ्हास झाल्या प्रकरणी कांदळवन (संरक्षण) अधिनियम 1986 चे कलम 15 व 19 अन्वये श्री. रामचंद्र जे. वैष्णव, श्री.श्यामसुंदर राधेशाम अग्रवाल, श्री. शुभम मुरलीधर अग्रवाल यांचे विरुध्द भाईंदर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्र.23/2020 दि.30.01.2020 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे नमूद केले आहे.<br>• मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे दि.18.07.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर ठिकाणी स्थळ पाहणी केली असता जे.सी.बी.च्या सहाय्याने जमिनीचे सपाटीकरण झाल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच सदरची जमिन कांदळवन क्षेत्राच्या 50 मीटर बफर झोनमध्ये बाधित होत असून त्या ठिकाणी नव्याने माती भराव व कांदळवन झाडांची कत्तल झाल्याचे आढळून आलेले नाही. तसेच त्या ठिकाणी जे.सी.बी. च्या सहाय्याने सुकलेली झाडे साफ केल्याचे निदर्शनास आले आहे असे नमूद केले आहे. | 1. जिल्हाधिकारी ठाणे<br>2. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • **या प्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे यांना सदर जागा खासगी आहे किंवा सरकारी या बाबत पडताळणी करावी तसेच आयुक्त, मीरा-भाईंदर महानगरपालिका यांनी डेब्रिज काढण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी तसेच सदर जागेवर कांदळवनाची पुर्न:लागवड (Restoration) करण्याचे मा.अध्यक्ष यांनी निर्देश दिले.** | |
| 34 | तक्रार क्र. 77 श्री. धिरज परब:- मिरा भाईंदर महापालिका हद्दीतील मिरा रोड पश्चिम येथे नाझरेथ आगर परिसरात सरकारी व खाजगी जागेत कांदळवन पाणथळचा ऱ्हास करून CRZ चे उल्लंघन. दि.11.06.2018 | • विभागीय वन अधिकारी यांचे दि.06.04.2023 रोजीच्या प्राप्त अहवालानुसार तक्रार अर्जातील नमुद क्षेत्र हे मौजे भाईंदर स.नं.147, 151 व 146 मधील आहे. सदर क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्र नाही. सद्यस्थितीत काही भागात तिवर व मेस्वाक ही कांदळवनाची झाडे आहेत व काही जागेवर चाळीचे बांधकाम केलेले दिसून येत आहे. सदर क्षेत्र खाजगी व सरकारी असल्याने महसूल खात्याने त्यावर कार्यवाही करावी.<br>• मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे दि.18.07.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर डेब्रिज / माती भराव काढणेबाबत अंदाजपत्रक तयार करणेचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेमार्फत करण्यात येणार आहे असे नमूद केले आहे.<br>• **या प्रकरणी मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी डेब्रिस/भराव हटविण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी. तसेच जिल्हाधिकारी ठाणे यांना पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्ष यांनी दिले.** | 1. जिल्हाधिकारी ठाणे<br>2. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| 35 | तक्रार क्र. 104 श्री. धिरज परब दि.19.11.2019.<br>भाईंदर पश्चिम येथे एसटी डेपोच्या आरक्षणातील कांदळवन नष्ट केलेबाबत तसेच बेकायदा डेब्रिस चा भराव व थर्माकोल आदींचा कचरा टाकून पर्यावरणाचा ऱ्हास प्रकरणी. | • अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे दि.01.03.2023 रोजीच्या अहवालानुसार सन 31 डिसेंबर 2005 रोजी MRSAC Map नुसार तक्रारीतील नमूद जागेवर काही ठिकाणी कांदळवन दिसून येत आहे. सद्यस्थितीत मौजे भाईंदर स.क्र.342/1 ही जागा सरकारी असून, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यासाठी आरक्षित आहे. स.क्र.342/1 च्या एकूण क्षेत्रापैकी 103.8320 हे. क्षेत्र भारतीय वन अधिनियम 1927 चे कलम 4 नुसार राखीव कांदळवन म्हणून घोषित केले आहे. कांदळवनांचा ऱ्हास झाला असल्याचे नमूद केले आहे.<br>• तसेच सदरची जागा मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या अखत्यारीत असल्याने सदर ठिकाणी झालेला माती भराव काढून टाकणे, कुंपण गेट तयार करुन महापालिकेचे सुरक्षा रक्षक तैनात करणे तसेच सदर जागेत खाजगी वाहनांची पार्किंग होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत कळविण्यात आले असल्याचे नमूद | 1. जिल्हाधिकारी ठाणे<br>2. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका<br>3. आगार व्यवस्थापक, परिवहन मंडळ, ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | केले आहे.<br>• मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे दि.18.07.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर जागेवर सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळ यांच्या बसेस पार्कींग केली जात असल्याचे व त्या ठिकाणी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळ यांचेमार्फत सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• **या प्रकरणी मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी डेब्रिस/भराव हटविण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी. तसेच जिल्हाधिकारी ठाणे यांना पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 36 | तक्रार क्र.150 श्री. स्टॅलिन डी. दि.09.04.2021 Apparent Land grab, illegal construction and destruction of Mangroves, Coastal wetlands and CRZ 1 areas at Dive region. Illegal construction of cement mixing plant at Dive. | • विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांच्या दि.27.10.2022 रोजीच्या अहवालानूसार तक्रारीमधील नमूद क्षेत्र अधिसुचित कांदळवन क्षेत्र नाही. तक्रारीमधील नमूद क्षेत्र हे बफर झोन मध्ये येत आहे. सन 2005 साली नमूद जागेवर कांदळवन दिसून येत नाही. तसेच सद्यस्थितीतही नमूद जागेवर कांदळवन दिसून येत नसल्याचे नमूद केले आहे.<br>• तहसीलदार व कार्यकारी दंडाधिकारी, भिवंडी यांच्या दि.23.08.2023 रोजीच्या अहवालानुसार मौजे दिवे अंजुर ता. भिवंडी येथील स.नं.180 पै या जागेवरील गणेशघाट ते स्मशानभुमी (सिमेंट क्रॉक्रीटची पायवाट) लगत डाव्याबाजुस कांदळवन दिसून येते. तसेच स.नं. 237 पै या जागेवर भारती इन्फ्रास्ट्रक्चर व कोणार्क स्टक्चर RMC Plant चे बांधकाम दिसून येते. महसूल व वनविभागाकडील दि.11.01.2021 रोजीच्या अधिसूचनेनुसार स.नं.180/ब मधील क्षेत्र 10.72.66 हे.आर राखीव वने म्हणून घोषित करणेत आले आहे. तरी सदरचे गाव हे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या नियोजन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात येत असल्याने सदर प्राधिकरणाकडून कार्यवाही होणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.<br>• मौजे दिवे अंजुर ता. भिवंडी येथील स.नं.180 व 237 या जागेची हदद निश्चिती नसल्याने सदर जागेलगत असलेल्या भारती इन्फ्रास्ट्रक्चर व कोणार्क स्टक्चर RMC Plant धारकांवर वनपरिक्षेत्र अधिकारी ठाणे, मुंबई कांदळवन संधारण घटक यांनी E-4/2021-22 दि.23.04.2021 अन्वये गुन्हा दाखल करणेत आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी ठाणे यांनी आवश्यक कार्यवाही करुन पुढील** | 1. जिल्हाधिकारी, ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **बैठकीपूर्वी अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 37<br><br><br><br><br>38 | तक्रार क्र. 153 श्री.रोहीत जोशी दि.17.06.2021 Huge reclamation of creek at Mumbra-Diva<br><br>तक्रार क्र. 192 <u>श्री. गणेश पाटील</u> – दि.13.07.2022<br>मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा अवमान करुन मौजे दिवा येथे आदित्य गोयल यांच्या जमिनीतील मॅग्रोजच्या झाडांची कत्तल व पर्यावरणाची हानी करुन होत असलेल्या बेकायदेशीर रेती उत्खननाबाबत. | • ठाणे महानगरपालिका यांच्या दि.25.10.2022 रोजीच्या अहवालानूसार सदर स्थळाची दि.25.06.2022 रोजी पाहणी केली असता, सदरचा रस्ता हा दिवा प्रभाग समिती अंतर्गत नव्याने घटीत झालेल्या प्रभाग क्र.43 मध्ये येत आहे. या परिसरात काही ठिकाणी चुहा ब्रिजच्या बाजूला डेब्रिजची भरणी केल्याचे आढळले. या रस्त्याच्या काही भूखंडाची **मालकी वन विभागाची** असल्याचे जागेवर लावलेल्या जाहिरात फलकावरुन दिसून येते. तरी सदर प्रकरणी आवश्यकती कार्यवाही करण्याकरिता **वन विभागास निर्देश देणे** उचित असल्याचे नमूद केले आहे.<br>• विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांच्या दि.23.11.2022 रोजीच्या अहवालानूसार नमूद क्षेत्रापैकी मौजे दिवा स.क्र.236 मध्ये काही भागात अंदाजे 2.45 हेक्टर राखीव कांदळवन क्षेत्रात सिमेंट, विटा, रेती या डेब्रीजचा कचरा टाकल्याने व सदर ठिकाणी मोठी भिंत बांधून पाम क्रिक हॉटेल बांधल्याने <u>श्री. गणेश निळकंठ पाटील</u> यांचे विरुध्द वनक्षेत्रपाल ठाणे यांनी वनगुन्हा नोंदविला आहे. सदर अतिक्रमणातील भिंत व काही भाग दि.02.11.2022 रोजी निष्कासित करण्यात आले असून सदर क्षेत्राची हद्द निश्चित झाल्यानंतर उर्वरित क्षेत्रातील अतिक्रमण निष्कासित करण्याची कार्यवाही करणेत येईल.<br>• तसेच अधिसुचित क्षेत्राव्यतिरिक्त अन्य ठिकाणी झालेल्या रेती उत्खननाबाबत तहसिलदार, ठाणे यांना संयुक्त स्थळपाहणी करुन कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• **तथापि तक्रार क्र.192 <u>श्री. गणेश पाटील</u> यांच्या तक्रारच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी ठाणे व विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्ष यांनी दिले.** | 1. जिल्हाधिकारी ठाणे<br>2. विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ. |
| 39 | तक्रार क्र. 170 श्री. अमजद खान – दि.21.02.2022 – मौजे पेणकरपाडा ता. जि. ठाणे जु.स.नं.२०६, नवीन सं.नं. ३८/२ या जागेवर कांदळवनापासून ५० मी. परिसरात कांदळवनाची कत्तल | • अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे दि.22.06.2023 च्या अहवालानूसार कांदळवनाचा ऱ्हास झाला असून या कार्यालयाचे पत्र दि. 22.06.2023 नूसार मंडळ अधिकारी, भाईंदर यांना संबंधितांवर पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 चे कलम 15 व 19 अन्वये गुन्हा दाखल करणेबाबत कळविण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला यांचे दि.19.07.2023 रोजीच्या | 1. जिल्हाधिकारी ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | व भरणी करुन, त्यावर विकासक / भुमाफिया यांनी अनधिकृतरित्या कांदळवनालगत पत्र्याचे कुंपण करुन कांदळवनाचा ऱ्हास व सीआरझेड चे उल्लंघन केल्याबाबत. | अहवालानूसार सदरचे ठिकाण हे मौजे पेणकरपाडा ता.जि.ठाणे जु.स.नं.206, नवीन सं. न. 38/2 येथील आहे. तक्रारीमधील नमुद क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्र नाही. तक्रारीमधील नमुद क्षेत्र खाजगी कांदळवन आहे. सन 2005 साली नमूद जागेवर कांदळवन दिसून येत आहे. तसेच सद्यस्थितीत नमूद जागेवर कांदळवन दिसून येत नाही. सदर जागेत दगड मातीची भराव टाकून सपाटीकरण केलेले आहे. या जागेच्या चारही बाजूचा विटांच्या भिंती बांधून आत मध्ये तीन ते चार झोपडया बांधलेल्या दिसून येत आहे. तसेच या जागेच्या भिंतीला लागूनच जाफरी खाडीचे पात्र असून या खाडी मध्ये अविसिनिया मरिना या प्रजातीची मोठया उंचीची झाडे आहेत. त्याअनुषंगाने अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांना कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे.<br>• मिरा – भाईंदर महानगरपालिका यांचे दि.30.06.2023 रोजीच्या प्राप्त अहवालानूसार, सदर तक्रारीच्या अनुषंगाने स्थळपाहणी केली असता सदर ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास, अतिक्रमण होऊ नये व सदर ठिकाणी नाल्यास लागून नागरीकांमार्फत कचरा / डेब्रिज टाकू नये तसेच सदरचा परिसर स्वच्छ राहणेकामी महापालिकेमार्फत कांदळवन क्षेत्रास हानी न होता रस्त्यास लागून पत्र्याचे तात्पुरते कुंपण बांधुन, कांदळवन संरक्षित करण्यात आलेले असल्याचे नमूद केले आहे.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी ठाणे यांनी आवश्यक कार्यवाही करुन अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 40 | तक्रार क्र. 172 श्री. अमजद खान – दि.21.02.2022 – मौजे घोडबंदर ता. जि. ठाणे येथील स.नं. २० ते २५, १११, ११२, ११७, ११८, ११९, १२५ व १२६ या जागेवर कांदळवनापासून ५० मी. परिसरात कांदळवनाचा ऱ्हास, सीआरझेड चे उल्लंघन करुन मे.जे.पी. इन्फ्रा या विकासकामार्फत इमारतीचे | • अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे दि.22.06.2023 च्या अहवालानूसार सदर क्षेत्र अधिसूचित कांदळवन नाही. सदरच्या सर्व्हे क्रमांकामध्ये सद्यस्थितीत जागेवर खूप मोठ्या प्रमाणात दगड मातीची भरणी करुन इमारतीचे बांधकाम चालू असल्याचे दिसून आले. इमारत बांधकामासाठी लागणारे पाणी साठवण्यासाठी लहान लहान तलाव खोदले असून, या संपूर्ण परिसरात आजूबाजूला बांधकाम साहित्य टाकलेले आढळून आले या जागेच्या परिसरामध्ये कोणत्याही प्रकारची कांदळवनाची झाडे दिसून आली नाहीत. आजूबाजूस कोणत्याही प्रकारची पाणथळ जागा दिसून आली. परंतु इमारतीच्या एका भागात भिंती लगत मिसवाक या कांदळवन सहयोगी वनस्पतीचे 2 फुटांचे रोप आढळून आले. परंतु सदर क्षेत्राचे जीपीएस निर्देशांक गुगल अर्थच्या सहाय्याने 2005 | 1. जिल्हाधिकारी, ठाणे<br>2. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | बांधकाम केलेबाबत. | सालाच्या छायाचित्रांचे अवलोकन केले असता सदर जागा ही शेतीसाठी वापरत असल्याचे दिसते व शेजारी पाणथळ जागा असल्याचे दिसून येत असून कांदळवनाचा ऱ्हास झाला नसल्याचे नमूद केले आहे.<br>• विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला यांचे दि.19.07.2023 रोजीच्या अहवालानूसार सदरचे ठिकाण हे मौजे घोडबंदर, ता.जि. ठाणे येथील स.नं.20 ते 25, 111, 112, 117, 118, 119, 125 व 126 येथील आहे. तक्रारीमधील नमुद क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्र नाही. तक्रारीमधील नमुद क्षेत्र हे बफर झोन मध्ये येत आहे. सन 2005 साली नमूद जागेवर कांदळवन दिसून येत नाही. तसेच सद्यस्थितीत नमूद जागेवर कांदळवन दिसून येत नाही. सदरच्या सर्वे क्रमांकामध्ये <u>सद्यस्थितीत जागेवर खूप मोठया प्रमाणात दगड मातीची भरणी करुन इमारतीचे बांधकाम चालू असल्याचे दिसून आले.</u> इमारत बांधकामासाठी लागणारे पाणी साठवण्यासाठी लहान लहान तलाव खोदले असून या संपूर्ण परिसरात आजूबाजूला बांधकामाचे साहित्य टाकलेले आढळून आले. या जागेच्या परिसरामध्ये कोणत्याही प्रकारची कांदळवनाची झाडे दिसून आली नाहीत. परंतु इमारतीच्या एका भागात भिंती लगत मिसवाक ही कांदळवन सहयोगी रोप आढळून आले. त्याअनुषंगाने अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांना कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे.<br>• **या प्रकरणी मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी डेब्रिस/भराव हटविण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी. तसेच जिल्हाधिकारी ठाणे यांना पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 41 | तक्रार क्र. 173 श्री. अमजद खान – दि.21.02.2022 – मौजे नवघर, ता.जि.ठाणे येथील जु.स.नं. २७२, नवीन स.नं. ८४/२, ८४/५ व जु.स.नं. २८५, नवीन स.नं. ८६/२ या जागेवर कांदळवनापासून ५० मीटर परिसरात कांदळवनाचा ऱ्हास, सीआरझेड चे उल्लंघन करुन मे. | • अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे दि.17.07.2023 च्या अहवालानूसार सदर ठिकाणी सन 2005 च्या MRSAC मॅप नूसार कांदळवन नाही. अधिसूचित कांदळवन क्षेत्र नाही. जमीन सरकारी नसून खाजगी कांदळवन क्षेत्र आहे. सदर ठिकाण 50 मीटर बफर झोन मध्ये येते. <u>कांदळवनाचा ऱ्हास झाला नसल्याचे नमूद केले आहे.</u><br>• विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला यांचे दि.19.07.2022 रोजीच्या अहवालानूसार सदरचे ठिकाण हे मौजे नवघर ता.जि.ठाणे जु.स.नं.272, नवीन स.नं.84/2, 84/5 व जु.नं.क्र. 285, नवीन स.न. 86/2 येथील आहे. तक्रारीमधील नमुद क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्र नाही. तक्रारीमधील नमुद क्षेत्र खाजगी | 1. जिल्हाधिकारी, ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रिमियर रिआलिटी या विकासमार्फत सहकार सी विव्ह व सहकार प्रिमियम या इमारतीचे बांधकाम केलेबाबत. | कांदळवन क्षेत्र आहे. सदर क्षेत्र खाजगी मालकीचे असून सद्यस्थितीत नमूद जागेवर बांधकामाच्या भिंतीला लागूनच काही ठिकाणी कांदळवनाच्या प्रजाती ॲवेसिनीया मरिना, ऑफिसिनालिस व कांदळवन सहयोगी मिसवाक झाडे दिसून आली. त्याअनुषंगाने अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांना कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी ठाणे यांनी आवश्यक कार्यवाही करुन अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 42 | तक्रार क्र.175 श्री. अमजद खान - दि.21.02.2022 –मौजे नवघर, (कणाकिया) ता.जि.ठाणे येथील जु.स.नं.२८७, २५६, २५५, २५८, २५९, २५७ नवीन स.नं. ५२, ४९, ४८, ५०, ५१, ४० या जागेवर कांदळवनापासून ५० मीटर परिसरात कांदळवनाचा ऱ्हास, सीआरझेड चे उल्लंघन करुन ओस्तवाल बिल्डर्स या विकासमार्फत ओस्तवाल होराईझोन या इमारतीचे बांधकाम केलेबाबत. | • विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला यांचे दि.19.07.2022 रोजीच्या अहवालानूसार तक्रारीमधील नमूद क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्र नाही. परंतु बफर झोन मध्ये येत आहे. सन 2005 साली स.क्र. 50, 51 या ठिकाणी अंशत: कांदळवन दिसून येत आहे. स.क्र. 52, 49, 48 व 40 येथे कांदळवन दिसून येत नाही. तसेच सद्यस्थितीत नमूद जागेवर कांदळवन दिसून येत नाही. त्याअनुषंगाने अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांना कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे.<br>• अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे दि.22.06.2023 च्या अहवालानूसार सदर क्षेत्र अधिसूचित कांदळवन नाही. सदरच्या सर्व्हे क्रमांकामध्ये सद्यस्थितीत पंजाब नॅशनल बँकेच्या जप्त केलेल्या गाडया उभ्या करुन ठेवण्यात आल्या आहेत. सर्व्हे क्रमांकाच्या परिसरात कांदळवनाची व कांदळवन सहयोगी झाडे आढळून आली नाहीत. 2005 सालाच्या छायाचित्रांचे अवलोकन केले असता, सदर जागा ही शेतजमीन असल्याचे निदर्शनास येत असून कांदळवनाचा ऱ्हास झाला नसल्याचे नमूद केले आहे.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी ठाणे यांनी आवश्यक कार्यवाही करुन अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | 1. जिल्हाधिकारी ठाणे |
| 43 | तक्रार क्र.176 श्री. अमजद खान – दि.21.02.2022 – मौजे नवघर (कणाकिया) ता. जि. ठाणे येथीलसर्वेक्र.२७२,२७३,२७९,५१२ नवीन स.नं.८४,७७,७६,७५ या जागेवर कांदळवनापासून ५० | • विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला यांचे दि.19.07.2022 रोजीच्या अहवालानूसार सदरचे ठिकाण हे मौजे नवघर (कणाकिया) ता.जि.ठाणे येथील सर्वे क्र.272, 273, 279, 512 नवीन स.नं. 84, 77, 76, 75 येथील आहे. तक्रारीमधील नमूद क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्र नाही. तक्रारीमधील नमूद क्षेत्र हे खाजगी कांदळवन आहे. सन 2005 साली स.क्र.77, 76 व 75 मध्ये अंशत: कांदळवन दिसून येत आहे. स.क्र. 84 येथे कांदळवन दिसून येत नाही. तसेच | 1. जिल्हाधिकारी ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | मी. परिसरात कांदळवनाची बेसुमार कत्तल व भरणी करुन त्यावर विकासक/ भुमाफिया यांनी अनधिकृतरित्या झोपडपट्टी बांधली असुन, कांदळवनालगत पत्र्याचे कुंपण करुन कांदळवनाचा ऱ्हास व सीआरझेड चे उल्लंघन केले असलेबाबत. | सद्यस्थितीत नमूद जागेवर कांदळवन दिसून येत आहे. सदर सर्व क्रमांकामध्ये सद्यस्थितीत जागेवर मातीची भरणी केल्याचे निदर्शनास येत आहे. या सर्व क्रमांकाच्या परिसरात कांदळवनाची व कांदळवन सहयोगी झाडे असल्याचे आढळून आले आहे. त्याअनुषंगाने अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांना कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे.<br>• अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे दि.22.06.2023 च्या अहवालानूसार कांदळवनाचा ऱ्हास झाला असून अज्ञात व्यक्ती विरुध्द पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 चे कलम 15 नूसार FIR No. 0237 दि.13.06.2022रोजी मिरा रोड पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी ठाणे यांनी आवश्यक कार्यवाही करुन अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 44 | तक्रार क्र. 178 श्री. अमजद खान दि.21.02.2022 – मौजे नवघर (कणाकिया) ता. जि. ठाणे येथील जु.स.नं. २८५, २७९, २७३, २८०, २७२ , नवीन स.नं. ८६/२, ७६,७७,९१,८४ या जागेवर कांदळनापासून ५० मी. परिसरात विकासक / भुमाफिया यांनी कांदळवनाची बेसुमार कत्तल व भरणी करुन कांदळवनाचा ऱ्हास व सीआरझेड चे उल्लंघन केले असलेबाबत. | • विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ, कुर्ला यांचे दि.19.07.2022 रोजीच्या अहवालानुसार सदरचे ठिकाण हे मौजे नवघर (कणाकिया) ता.जि.ठाणे येथील जु.स.नं. 285, 279, 273, 280, 272 नवीन स.नं. 86/2, 76, 77, 91, 84 येथील आहे. तक्रारीमधील नमूद क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्र नाही. तक्रारीमधील नमुद क्षेत्र हे खाजगी कांदळवन आहे. सन 2005 साली स.क्र.76, 77 व 91 मध्ये अंशत: कांदळवन दिसून येत आहे. स.क्र.86/2 व 84 येथे कांदळवन दिसून येत नाही. सदर सर्व क्रमांकामध्ये सद्यस्थितीत जागेवर मातीची भरणी करुन इमारत बांधण्याचे काम चालू असून या इमारतीच्या कुंपणाच्या भिंती लगत अविसिनिया मरिना व अविसिनिया ऑफिसिनालिस या कांदळवन प्रजातींची झाडे दिसून आली तसेच भेंड, मिसवाक या कांदळवन सहयोगी प्रजातींची झाडे सुध्दा आढळून आली. त्याअनुषंगाने अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांना कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे.<br>• अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे दि.22.06.2023 च्या अहवालानूसार कांदळवनाचा ऱ्हास झाला असून अज्ञात व्यक्ती विरुध्द पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 चे कलम 15 नूसार FIR No. 0237 दि.13.06.2022रोजी मिरा रोड पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. | 1. जिल्हाधिकारी ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • **या प्रकरणी जिल्हाधिकारी ठाणे यांनी आवश्यक कार्यवाही करुन अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 45 | तक्रार क्र. 180 श्री. दिलिप काकनाटे - दि.21.02.2022.<br>नवी मुंबई येथील खारफूटीच्या विनाशाबद्दल अनधिकृत भरणीबाबतची तक्रार. | • उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी ठाणे, उपविभाग ठाणे यांचे कार्यालयाकडील दि. 11.07.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर ठिकाणी माती मिश्रीत डेब्रीजचा भराव दिसून आला. परंतु सदरची जागा एम.आय.डी.सी. यांचे मालकीची असून त्यांनी सदर जागेचा आगाऊ ताबा वनपाल वन्यजीव घटक, ठाणे यांना दि.08.08.2022 रोजी दिलेला असल्याचे नमूद केले असून कांदळवनाचा ऱ्हास झालेला नसल्याचे नमूद केले आहे.<br>• **या प्रकरणी विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना या तक्रारीबाबत अहवाल सादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्ष यांनी दिले.** | 1. विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ. |
| 46 | तक्रार क्र. 198 (100 तक्रारी)<br>श्री. अमजद खान, व्यवस्थापकीय संचालक, वसुंधरा संवर्धन ट्रस्ट, मुंबई यांचेकडून प्राप्त 100 तक्रारींबाबत.<br>दि.27.05.2022 | • विभागीय वन अधिकारी यांचे दि.26.06.2023 रोजीच्या प्राप्त अहवालानुसार एकूण 100 तक्रारींपैकी 100 ठिकाणांची स्थळपहाणी करण्यात आली आहे. सदर 100 तक्रारींचे अवलोकन करता अधिसूचित कांदळवन क्षेत्रावर कांदळवन कक्षा मार्फत उचित कार्यवाही करण्यात येत असून उर्वरित तक्रारींचे क्षेत्र हे अधिसूचित कांदळवन क्षेत्र नसल्याने पुढील कार्यवाहीकरीता अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मिरा-भाईंदर यांना उचित कार्यवाहीसाठी कळविण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे दि.02.08.2023 रोजीच्या अहवालानूसार एकूण 100 पैकी 59 तक्रारींमध्ये कांदळवनाचा ऱ्हास झाला नसल्याचे दिसून आले. तर तीन (3) तक्रारींमध्ये कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून येते. (मौजे नवघर येथील स.क्र.51 व 68 ही जमीन 7/11 क्लब यांच्या मालकीची असून, त्यामध्ये पुर्वीच 7 गुन्हे दाखल करणेत आलेले आहेत.) स.क्र.15 अधिसूचित कांदळवन असून, सदर ठिकाणी वन विभागाद्वारे वन गुन्हा दाखल करणेत आलेला आहे. उर्वरित 38 तक्रारींमध्ये कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही याबाबत स्पष्ट नमूद करणेत आलेले नसल्याने, त्याबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी, ठाणे (कांदळवन) यांचे कार्यालयास दि.21.07.2023 रोजीच्या पत्रान्वये विचारणा करणेत आलेली आहे.<br>• मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे दि.18.07.2023 रोजीच्या प्राप्त अहवालानूसार, अमजद खान यांच्या एकूण 100 तक्रारींपैकी 64 तक्रारींवर तसेच | 1. मिरा-भाईंदर महानगरपालिका (100 तक्रारींपैकी 64 तक्रारींचा अहवाल प्राप्त) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 35 तक्रारींपैकी 9 तक्रारींवर कार्यवाही केलेबाबतचा अहवाल समितीस प्राप्त झाला आहे.<br>• **या प्रकरणी मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना उर्वरित तक्रारींवर उचित कार्यवाही करुन पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 47 | तक्रार क्र. 200 श्री. इमरान शेख Illegal construction within 50m buffer Zone of Mangroves.<br>Date : 27.09.2022. | • मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे दि.14.03.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर ठिकाणची स्थळ पहाणी केली असता सदर परिसरात नव्याने कोणतेही माती भराव व बांधकाम झाल्याचे निदर्शनास आले नसल्याचे नमूद केले आहे. तसेच सदर संदर्भातील छायाचित्रे (जीपीएस लोकेशनसह) सादर केलेली आहेत.<br>• परंतु तक्रारदार यांचा या तक्रारी संदर्भात दि.05.04.2023 रोजी पुन:श्च तक्रार प्राप्त झाली असून दि.12.04.2023 रोजीच्या पत्रान्वये पुन:श्च स्थळ पाहणी अहवाल मागविण्यात आला आहे.<br>• मिरा – भाईंदर महानगरपालिका यांचे दि.18.07.2023 रोजीच्या प्राप्त अहवालानूसार, सदर तक्रारीच्या अनुषंगाने प्रत्यक्ष स्थळपाहणी केली असता सदर परिसरात नव्याने कोणताही माती भराव व बांधकाम झाल्याचे दिसून आलेले नाही.<br>• **या प्रकरणी मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या अहवालाच्या अनुषंगाने मा.अध्यक्ष यांनी सदर तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले.** | - |
| 48 | तक्रार क्र.213 श्री. अमजद खान, व्यवस्थापकीय संचालक, वसुंधरा संवर्धन ट्रस्ट, मुंबई यांचेकडून प्राप्त 35 तक्रारींबाबत. दि.09.02.2023. | • विभागीय वन अधिकारी यांचे दि.26.06.2023 रोजीच्या प्राप्त अहवालानुसार एकूण 35 तक्रारींपैकी 35 ठिकाणांची स्थळपहाणी करण्यात आली आहे. सदर 35 तक्रारींचे अवलोकन करता अधिसूचित कांदळवन क्षेत्रावर कांदळवन कक्षा मार्फत उचित कार्यवाही करण्यात येत असून उर्वरित तक्रारींचे क्षेत्र हे अधिसूचित कांदळवन क्षेत्र नसल्याने पुढील कार्यवाहीकरीता अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मिरा-भाईंदर यांना उचित कार्यवाहीसाठी कळविण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे दि.18.07.2023 रोजीच्या प्राप्त अहवालानूसार, अमजद खान यांच्या 35 तक्रारींपैकी 9 तक्रारींवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस प्राप्त झाला आहे.<br>• **या प्रकरणी मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना उर्वरित तक्रारींवर उचित कार्यवाही करुन पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर** | 1.मिरा-भाईंदर महानगरपालिका (35 तक्रारींपैकी 9 तक्रारींचा अहवाल प्राप्त) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 49 | तक्रार क्र.218 श्री. सचिन वसंत भोईर.<br>Illegally encroachment on government Khjan land and construction in CRZ are by demolishing Mangroves.<br>दि. 13.02.2023 | • तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, भिवंडी यांचे कार्यालयाच्या दि.13.07.2023 रोजीच्या अहवालानूसार स.नं.63, 64 व 65 अ या सरकारी खाजण जमीनी मौजे कोपर गावचे शिवेस लागून आहे व सदर जमीनीलगत खाजगी मालकीचे स.नं. च्या जमीनी आहेत व सदर खाजगी मालकीच्या स.नं. मध्ये सुमारे 15 वर्षापूर्वी बांधकामे झालेली आहे. तसेच स.नं. 63, 64 व 65 अ च्या आजूबाजूच्या जमीनीमध्ये कांदळवन दिसून आलेले नाही. मौजे कोपर या गावचे सन 2005 सालचा MRSAC चे नकाशे उपलब्ध नाही. तरी सदरचे कोपर गाव हे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे कार्यक्षेत्रात येत असल्याने या कार्यालयाचे दि. 13.07.2023 रोजीचे पत्रान्वये कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• **तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, भिवंडी यांच्या अहवालानूसार सदर ठिकाणी कांदळवन दिसून आले नसल्याने मा. अध्यक्ष यांनी सदर तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले.** | 1. जिल्हाधिकारी ठाणे<br>2. विभागीय वन अधिकारी, मुं.कां.सं.घ.<br>3. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| 50 | तक्रार क्र.219 श्री.धिरज परब.<br>मा.उच्च न्यायालयास खोटी माहिती देऊन फसवणूक करत पर्यावरण व कांदळवनाचा ऱ्हास करणाऱ्या मीरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागासह संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर संगनमत-कटकारस्थान केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करुन फौजदारी व निलंबनाची प्रशासकीय कारवाई करणे तसेच खाडी पात्रात व कांदळवन मध्ये काँक्रीट नाले बांधण्याचे काम तात्काळ बंद करणे व झालेले नाले | • आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या दि.23.06.2023 रोजीचा अहवालानुसार महानगरपालिकेने सी.आर.झेड ने बाधित होणाऱ्या क्षेत्रामध्ये सी.आर.झेड प्राधिकरणाकडे विहित नमुन्यात परवानगीसाठी प्रस्ताव सादर करण्यात येतो व सी.आर.झेड प्राधिकरणामार्फत वेळोवेळी तज्ञ समितीने स्थळ निरिक्षण करुन दिलेल्या अहवालानुसार सी.आर.झेड प्राधिकरणाने महानगरपालिकेस परवानगी दिलेल्या होत्या व सी.आर.झेड. प्राधिकरणाने दिलेल्या मंजुरीमध्ये नमुद केलेल्या अटीनुसार मा. उच्च न्यायालयामध्ये परवानगीसाठी दावा दाखल करण्यात येतो.<br>• मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सी.आर.झेड. प्राधिकरण व मा.उच्च न्यायालय यांनी दिलेल्या परवानगीनूसार विविध विकास कामे करण्यात येतात. मिरा भाईंदर महानगरपालिके मार्फत नियमानुसार उल्लंघन न करता विकास कामे करण्यात आलेली आहेत. पर्यावरणाचा कोणत्याही प्रकारे ऱ्हास करण्यात आलेला नसल्याचे नमूद केले आहे.<br>• **या प्रकरणी आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी सविस्तर अहवाल सादर केलेला आहे. तथापि जिल्हाधिकारी ठाणे यांना पुढील बैठकीपूर्वी** | 1. जिल्हाधिकारी ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | तोडून टाकणेबाबत.<br>दि. 10.03.2023 | **अहवाल सादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 51 | तक्रार क्र.233 श्री. प्रदीप पाटोले<br>Heavy dumping of debris in Mangroves and creating playground in juhinagar Side. दि. 07.04.2023 | • उप आयुक्त (परि-1), नवी मुंबई महानगरपालिका यांचे दि.19.06.2023 रोजीच्या अहवालानूसार जुईनगर येथील कांदळवन क्षेत्रास दि.09.06.2023 रोजी स्थळपाहणी करण्यात आलेली असून सादर केलेल्या पंचनाम्यानुसार कांदळवन क्षेत्रात डेब्रीज भराव यापूर्वी टाकण्यात आल्याचे आढळले असल्याचे नमूद केले आहे. सोबत पंचनामा, Geo Tagged छायाचित्रे माहितीस्तव सादर करण्यात आलेली आहेत.<br>• तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी ठाणे यांचे कार्यालयाच्या दि.13.07.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर ठिकाणी काही प्रमाणात भराव केल्याचे दिसून आले. सदर जमीन आजरोजी राखीव वने व सिडको यांचे नावे दाखल आहे. सबब वन विभाग व सिडको यांचे मार्फत कार्यवाही होणे अपेक्षित असून कांदळवनाचा ऱ्हास झालेला नसल्याचे नमूद केले आहे.<br>• **या प्रकरणी नवी मुंबई महानगरपालिका यांनी डेब्रिस/भराव हटविण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी. तसेच जिल्हाधिकारी ठाणे यांना पुढील बैठकीपूर्वी पुन:श्च अहवाल सादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्ष यांनी दिले.** | 1. जिल्हाधिकारी ठाणे |
| 52 | तक्रार क्र. 234 आपले महानगर दैनिक या वृत्तपत्राच्या दि.20.03.2023 रोजीच्या बातमीबाबत. दि.27.03.2023 | • **या प्रकरणी मिरा-भाईंदर महानगरपालिका, जिल्हाधिकारी ठाणे यांना उचित कार्यवाही करुन पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | 1. मीरा-भाईंदर महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी ठाणे |
| 53 | तक्रार क्र. 235 श्री. राजीव दत्ता<br>Illegal unlawful destructions of wetland, hence this complaint for a lawful action at Priority. दि.03.05.2023 | • तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे यांचे कार्यालयाच्या दि.04.07.2023 रोजीच्या अहवालानूसार तक्रारदार यांनी सदर तक्रार अर्जामध्ये कोणत्याही प्रकारचे स.नं. चा उल्लेख नाही. परंतु आजरोजी मौजे-कशेळी, ता.भिवंडी या गावाचे संपूर्ण हद्दीत पहाणी केली असता कोणत्याही कांदळनाची तोड (ऱ्हास) झालेली नाही. तरी सदरचे गाव हे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे कार्यक्षेत्रात येत असल्याने सदर प्राधिकरणाकडून कार्यवाही होणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी ठाणे यांना तक्रारदार यांचे सोबत स्थळपाहणी करण्याचे निर्देश मा. अध्यक्ष यांनी दिले.** | 1. भिवंडी-निझामपूर महानगरपालिका<br>2. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

| | | | |
|---|---|---|---|
| 54 | तक्रार क्र. 238 श्री. कृष्णा गुप्ता भाईंदर ठाणे<br>मौजे भाईंदर स. नं. 168 या ठिकाणी अनधिकृतपणे माती भराव करुन कांदळवन नष्ट केल्याप्रकरणी कारवाई करणेबाबत..दिनांक 25.05.2023 | • मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे दि.30.06.2023 रोजीच्या प्राप्त अहवालानूसार, सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.29.06.2023 रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारचे नवीन अथवा वाढीव बांधकाम झाल्याचे निदर्शनास आलेले नसल्याचे नमूद केले आहे.<br>• **या प्रकरणी मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे अहवालाच्या अनुषंगाने सदर तक्रार निकाली काढण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | 1. मिरा-भाईंदर महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी ठाणे<br>3. विभागीय वन अधिकारी |
| 55 | तक्रार क्र. 239 श्री. परवेश फाजल अब्बास<br>Encroachment on Government Owned Forest Land, Illegal Land filling and Construction on CRZ I Zone and Destruction of Mangroves Tedal Zone<br>दि. 12.04.2023 | • **या प्रकरणी जिल्हाधिकारी ठाणे यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | 1. ठाणे महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी ठाणे<br>3. विभागीय वन अधिकारी मुंबई कांदळवन संधारण घटक |
| 56 | तक्रार क्र. 245 श्री. बी. एन. कुमार<br>Massive destruction of mangrove near Vashi Rly station<br>दि. 02.06.2023 | • तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी ठाणे, जिल्हा ठाणे यांचे कार्यालयाच्या दि.13.07.2023 रोजीच्या अहवालानूसार सदर जागेवर तुरळक स्वरुपात ठिकठिकाणी डेब्रिज सदृश्य ढिग दिसून आले. सदरची जागा आज रोजी वन विभागाचे नावे असल्याने प्रकरणी वन विभागामार्फत कार्यवाही होणे अपेक्षित असून कांदळवनाचा ऱ्हास झालेला नसल्याचे नमूद केले आहे.<br>• **या प्रकरणी विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांना पुढील बैठकीपूर्वी या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | 1. मीरा-भाईंदर महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी ठाणे<br>3. विभागीय वन अधिकारी मुंबई कांदळवन संधारण घटक |
| 57 | तक्रार क्र. 246 श्री. धीरज परब<br>भाईंदरच्या उत्तन येथील एस्सेल ग्रुपने कटकारस्थान करुन कित्येक एकर जागेतील कांदळवनाची प्रचंड तोड व बांध घालून | • अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे दि.22.06.2023 च्या अहवालानूसार सदर रस्त्यामुळे एकबाजूचे खाडीचे पाणी अडविले गेले असून, दुसऱ्या बाजुच्या कांदळवनास नुकसान होत आहे. त्यामुळे सदर पाणी ठिक ठिकाणी रस्ता खोदुन मोकळे करणे आवश्यक आहे. त्याबाबत या कार्यालयाच्या दि. 24.12.2020 अन्वये, उपआयुक्त, अतिक्रमणविभाग व प्रभाग | 1. मिरा-भाईंदर महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | पर्यावरणाचा ऱ्हास केल्याप्रकरणी संबंधित यांच्याकडून पर्यावरणाची हानी केल्याची नुकसान भरपाई वसूल करणे तसेच भराव-बांध काढून पुन्हा कांदळवन लागवड करणेबाबत.<br>दि. 06.06.2023 | अधिकारी, प्रभाग समिती क्र.01, मिरा- भाईंदर महानगरपालिका यांना कळविण्यात आले असल्याचे नमूद केले आहे. तसेच कांदळवनाचा ऱ्हास झाला असून मे. एस्सेल इंफ्रा प्रोजेक्टस लि. चे भराव करणारे व इतर बांधकाम करणारे ठेकेदार तसेच बांधकामासाठी साहित्य पुरविणारे यांचे विरुध्द पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 चे कलम 15 व 19 नूसार FIR No. 05/2013 दि. 13.12.2013, FIR No. 03/2015 दि.17.11.2015 व 0240/2020 दि.29.12.2020 रोजी उत्त् सागरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.<br>• **या प्रकरणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेने आवश्यक कार्यवाही करावी. तसेच जिल्हाधिकारी ठाणे यांनी झालेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
